**समरी फौ.ख.क्र.५५/२०१७**
**नि.क्र.५६**

आरोपी तर्फे साक्षीदार क्र.**०१** याचा जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :
माझे नांव **निलेश भिमराज तांबे**
वय ३७ वर्षे, धंदा:—नोकरी स्टेट बॅक ऑफ इंडीया डेप्यूटी मॅनेजर,
रा. अथर्व कॉम्प्लेक्स, ता.सावंतवाडी.

**<u>फिर्यादीतर्फे वकील श्री.डिंगणकर यांचेमार्फत साक्षीदाराचा सरतपास.</u>**

०१. मी सावंतवाडी शाखेत डेप्यूटी मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. आरोपी परीक्षित मांजरेकर याला मी ओळखतो. त्याचा आमची स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा— सावंतवाडी येथे खाते क्र. ११२३७३७५०८३ आहे. ज्या कागदपत्रांवर मी साक्ष देणेसाठी आलो आहे ते माझ्या बॅकेतील अखत्यारीतील कागद आहेत. अथर्वी एंटरप्रायझेजच्या लेटर हेडवर आरोपीने मॅनेजर, स्टेट बॅक ऑफ इंडीया दिनांक ०३/१२/२०१६ चे पत्र दिलेले होते. आज ते मूळ पत्र आणलेले आहे. त्या पत्राचा विषय होता की, आरोपीचे धनादेश क्र. ४१३३१७, ४१३३१८ हे दोन धनादेश गहाळ झाले म्हणून त्याने तो अर्ज दिला होता त्यामध्ये ते धनादेश गहाळ झाल्यामुळे ते जर वटण्यासाठी आले तर ते वटू नयेत असे त्यात आरोपीने नमूद केले. ते पत्र संबंधीत अधिकारी यांना मिळाले याबाबत त्यांची सही त्यावर आहे. तसेच आरोपीची देखील त्यावर सही आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>तक्रारदारतर्फे वकील श्री.सचिन सावंत यांचेमार्फत उलटतपासासाठी मुदतीचा अर्ज आल्याने व तो मंजूर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

दिनांक:—१६/०३/२०१९.

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग
**सावंतवाडी**